परळी

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...

# संघर्षनेता

संपादक - मोहन व्हावळे

https://www.parlisangharshneta.in

9881265102

बीड वर्षे- 10 वे | अंक क्र. 276 शनिवार दि. 08 नोव्हेंबर 2025 RNI: MAHMAR/2016/67060



# परळीच्या विकासाला ‘सर्वधर्मीय’ नेतृत्वाची जोड!

## हाजी राजा खान यांच्या पत्नीच्या नावाची नगर अध्यक्षपदासाठी जोरदार चर्चा!



## आमदार धनंजय मुंडे यांनी सामाजिक कार्याची भक्कम पार्श्वभूमी असलेल्या हाजी राजा खान यांच्या पत्नीला ‘ओपन महिला’ जागेतून संधी देण्याची मागणी




**परळी वैजनाथ**

आगामी परळी नगर परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या निमित्ताने शहराच्या राजकारणात सध्या एका नावाची जोरदार आणि सकारात्मक चर्चा सुरु झाली आहे. गेली अनेक वर्षे सर्वधर्मीय सामाजिक सलोखा आणि जनसेवेचा आदर्श निर्माण करणारे लोकप्रिय नगरसेवक हाजी राजा खान साहेब यांच्या पत्नीला ‘ओपन महिला’ आरक्षित जागेसाठी उमेदवारी द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा आमदार धनंजय मुंडे यांच्याकडे होत आहे. हाजी राजा खान यांचे सामाजिक कार्य इतके प्रभावी आहे की, आमदार मुंडे यांनी त्यांच्या पत्नीला संधी दिल्यास, हा निर्णय केवळ राजकीय नसून, सामाजिक बांधिलकीचा उत्कृष्ट नमुना ठरेल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

### जनसेवेचा अखंड वसा:

हाजी राजा खान साहेब आणि त्यांचे बंधू जाफर खान साहेब यांचे सर्वात मोठे बलस्थान म्हणजे त्यांनी अनेक वर्षांपासून सुरु ठेवलेला सामूहिक विवाह सोहळ्याचा उपक्रम. कोणत्याही धर्माचा किंवा जातीचा भेद न ठेवता, गरिबीमुळे विवाह रखडलेल्या उपेक्षित आणि दुर्बळ समाजातील जोडप्यांसाठी हे खान कुटुंब दरवर्षी मोठे सोहळे आयोजित करते. हे कार्य केवळ परळीतच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्यात सामाजिक एकोप्याचे आणि माणुसकीचे प्रतीक म्हणून ओळखले जाते.

याशिवाय, खान कुटुंबीयांनी लोकसेवेचा वसा कधीच सोडला नाही. कोरोना लॉकडाऊनच्या अत्यंत कठीण काळात त्यांनी असंख्य गरजू कुटुंबांना आर्थिक मदत केली. तसेच, वर्षभर अनेक विधवा महिलांना, समाजातील गरीब आणि वृद्ध व्यक्तींना नियमितपणे मदत करून, त्यांनी लोकांच्या अडचणीच्या काळात मदतीचा हात दिला आहे. सामाजिक कार्यात नेहमीच सक्रिय सहभाग घेऊन त्यांनी जनमानसात एक विशेष स्थान निर्माण केले आहे.

### विक्रमी मत क्षमता आणि वॉर्डाचा विकास :

हाजी राजा खान साहेब यांचे नेतृत्व हे केवळ समाजकारणावर आधारित नाही, तर त्याला राजकीय यश आणि नेतृत्वाची धार आहे. मागील नगरसेवक निवडणुकीत त्यांना संपूर्ण जिल्ह्यात विक्रमी (Record Breaking) मते मिळाली होती आणि ते पहिल्या क्रमांकाचे नगरसेवक ठरले होते. ही त्यांची अढळ लोकमान्यता सिद्ध करते. त्यांच्या नेतृत्वाखालील वॉर्डात सर्वाधिक विकास कामे झाली आहेत, ज्यामुळे त्यांच्या कामाचा ठसा स्पष्टपणे उमटतो.

विशेष म्हणजे, हाजी राजा खान साहेब हे परळी शहरातील प्रत्येक घरातील व्यक्तीशी जोडलेले आहेत. ते मुस्लिम असो, दलित असो किंवा इतर कोणताही समाज असो, खान साहेब प्रत्येक नागरिकाच्या सुख-दुःखात सहभागी होतात आणि त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी तत्पर असतात.

### मुंडे कुटुंबाशी निष्ठा आणि कृतज्ञतेचे समीकरण:

हाजी राजा खान साहेब यांचे कुटुंब कै. लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब आणि आमदार धनंजय मुंडे साहेब यांचे वडील कै. पंडित अण्णासाहेब मुंडे यांचे अत्यंत खंदे समर्थक आणि निष्ठावान राहिले आहेत. त्यांची ही निष्ठा आजच्या राजकीय वातावरणात अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.जर आमदार धनंजय मुंडे साहेबांनी खान साहेब यांच्या पत्नीला ‘ओपन महिला’ जागेसाठी उमेदवारी दिली, तर मुस्लिम समाज कायमस्वरुपी कृतज्ञतेची भावना ठेवील. या निर्णयामुळे धनंजय मुंडे साहेबांचे ‘सर्वसमावेशक आणि विकासवादी’ नेतृत्व अधिक प्रभावीपणे सिद्ध होईल. विरोधातील पक्षांना (विरोधकांना) आव्हान देऊन सामाजिक सलोखा आणि मतदारराजाचे भक्कम पाठबळ मिळवण्याचा हा एक निर्णायक क्षण ठरु शकतो.





## श्री अर्जुन तिडके नावाचे राजकिय काहुर भोगलवाडी पंचायत समिती मध्ये उडवणार धुराळा



भोगलवाडी ( बाबुराव तिडके ) धारूर पंचायत समितीचे मा सभापती श्री अर्जुन तिडके यांनी काही दिवसापुर्वी राष्ट्रवादी मध्ये प्रवेश केला ताई साहेब देखिल बोलल्या राजेभाऊ ( अण्णा ) गेले याचे दुःख नाही पण श्री अर्जुन तिडके हे गेल्याने दुःख वाटते कारण अर्जुन तिडके यांनी भाजपा करिता स्वःताचा संसार कुटुंब न पाहाता धारूर तालुक्यामध्ये भाजपाचा गड मजबुत केला त्यांचा स्वभाव सरळ खोटे न बोलणे आपल्या हातुन कोणाचे चांगले नाही झाले तरी चालेल पण वाईट होणार नाही याची ते पुरेपुर काळजी घेतात भाजप / मंत्री ताईसाहेब यांनी देखिल अर्जुन तिडके यांना आर्थिक राजकिय पाठबळ देऊन त्यांना पुढे आणने गरजेचे होते मंत्री ताईसाहेब यांच्या उशिरा लक्षात आल्याचे दिसते पण अर्जुन तिडके यांची राजकिय ताकत भोगलवाडी सर्कल सह धारूर तालुक्यात मोठी आहे होताना दिसत आ सोळंके साहेब श्री राजेभाऊ ( अण्णा ) मुंडे हे अर्जुन तिडके यांना भोगलवाडी पंचायत समिती निवडणुकीमध्ये उतरविणारच आहेत भाजपा मध्ये मोठे राजकिय नाटय घडुन गट - तट पडु शकतात याचा राजकिय फायदा कसा घ्यायचा यामध्ये अर्जुन तिडके माहीर हुशार असल्याने श्री अर्जुन तिडके नावाच्या राजकिय काहुराचा धुराळा उडुन समोरच्या उमेदवाराचे चारि - मुंड्या चित्त होतील असे बोलले जाते

## बाबा देशमाने संपादीत संवाद वार्षिक अंकाचे नवी दिल्लीतील महाराष्ट्र परिचय केंद्रात प्रकाशन

### संचालक हेमराज बागूल यांच्याकडून कौतुक



नवी दिल्ली प्रतिनिधी ज्येष्ठ पत्रकार बाबा देशमाने संपादीत संवाद 2025 या वार्षिक अंकाचे नवी दिल्ली स्थित महारष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागूल यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

महाराष्ट्र आणि गोवा राज्यात आपल्या सकारात्मक पत्रकारितेच्या माध्यमातून वेगळी ओळख निर्माण करणारे ज्येष्ठ पत्रकार बाबा देशमाने यांनी संवादः 2025 या वार्षिक अंकाचे संपादन केले आहे. संवादचे प्रकाशन नवी दिल्ली येथे महाराष्ट्र परिचय केंद्रात संचालक हेमराज बागूल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संपादक बाबा देशमाने, लढा दुष्काळाशी चळवळीचे प्रणेते ॲड. राज पाटील, सामाजिक कार्यकर्ते सुरेश माने, उद्योजक सोनाजी बहिर, महाराष्ट्र परिचय केंद्राचे नीलेश देशमुख आदींची उपस्थिती होती.

ज्येष्ठ पत्रकार बाबा देशमाने यांनी संवाद हा वार्षिक दिवाळी अंक अतिशय दर्जेदार प्रसिद्ध केला असून दिवाळी अंकाच्या कव्हर पेजवर सेलिब्रिटी नट हानट्याना प्राधान्य न देता सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरण प्रेमी ॲड. राज पाटील यांना मानाचे स्थान दिले आहे, ही खरोखरच कौतुकाची बाब आहे, अशा शब्दांत संचालक हेमराज बागूल यांनी संवाद अंकाचे आणि सर्व टीमचे कौतुक केले.

## आयुब खान पठाण यांना "द समाज रत्न" पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल महाराष्ट्र असंघटित कामगार संघटनेतर्फे सत्कार



परळी वैजनाथ (प्रतिनिधी):

परळी नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष व प्रभाग क्रमांक तीनचे भावी नगरसेवक आयुब खान पठाण यांना दैनिक सोमेश्वर तर्फे जाहीर झालेल्या "द समाज रत्न" पुरस्काराच्या निवडीबद्दल महाराष्ट्र असंघटित कामगार संघटनेतर्फे नेहरू चौक तळ येथे सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी संघटनेचे अध्यक्ष आयुब रहमान खान पठाण, सचिव नसीब खान, सामाजिक कार्यकर्ते जमीर शेख, तसेच युनूस भाई डीगुळकर, मुर्तुजा भाई तांबोळी, अफसर खान, हसन शेख, शोएब खान, अकबर शेख, जफर भाई आदी मान्यवर उपस्थित होते.






# ज्ञानक्रांतीची सुरुवात : डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी दिन

### ➡ मानवी जिद्दीच्या अद्भुत प्रवासाचे स्मरण..



7 नोव्हेंबर हा दिवस भारतीय समाजासाठी आणि शिक्षणविश्वासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे, कारण याच दिवशी 1900 साली छोट्या भिवा रामजी आंबेडकर या नावाने पुढे संविधान निर्माता ठरलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी साताऱ्यातील प्रतापसिंग हायस्कूलमध्ये शिक्षणाचा पहिला टप्पा सुरु केला. हा दिवस केवळ एका विद्यार्थ्याच्या शाळेत प्रवेशाचा नव्हता, तर भारतीय समाजातील शतकानुशतके चालत आलेल्या अंधश्रद्धा, जातिवाद आणि अन्यायावर ज्ञानशस्त्राने प्रहार करण्याच्या क्रांतीचा आरंभ होता. शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन शक्य आहे, हा विचार बाबासाहेबांच्या आयुष्याचा आधार बनला. म्हणूनच महाराष्ट्र शासनाने 2017 साली शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत शासन निर्णय (दि. 27 ऑक्टोबर 2017) जारी करून 7 नोव्हेंबर हा दिवस राज्यभर "डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी दिन" म्हणून साजरा करण्याचे निर्देश दिले. या दिवशी सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांच्या जीवनकार्यावर आधारित निबंध, वक्तृत्व, चित्रकला, वाचन, काव्यवाचन आदी उपक्रम आयोजित करण्याची सूचना करण्यात आली आहे.

बाबासाहेबांचा शैक्षणिक प्रवास अत्यंत कठीण परिस्थितीत सुरु झाला. समाजातील अस्पृश्यतेच्या आणि भेदभावाच्या काळात शिक्षण हे उच्चवर्णीयांचे एकाधिकार क्षेत्र मानले जात होते. अशा वेळी एका खालच्या जातीतील मुलाने शाळेत प्रवेश घेणे हीच एक मोठी सामाजिक घटना होती. भिवा शाळेत जात असे, परंतु त्याला बाकावर बसू देत नसत; शिक्षक पाण्याची बाटली हाताने न देता लांबून ओतत. अशा अपमानजनक परिस्थितीतही त्याने शिक्षणाचा त्याग केला नाही. त्या लहान भिवाच्या नजरेत शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नव्हते, तर आत्मसन्मान आणि सामाजिक स्वातंत्र्य मिळविण्याचे साधन होते. म्हणूनच नंतर बाबासाहेबांनी म्हटले, "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा."

त्यांच्या आयुष्याचा हा पहिला दिवस म्हणजे भारतीय समाजाच्या ज्ञानक्रांतीचा पहिला दिवस ठरला. एका छोट्या गावातील विद्यार्थी नंतर कोलंबिया विद्यापीठ, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि ग्रेज इन्स ऑफ लॉ येथे उच्च शिक्षण घेतो, हा प्रवास म्हणजे मानवी जिद्दीचा अद्भुत इतिहास आहे. शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील अन्यायाविरुद्ध लढा देणे हे बाबासाहेबांचे ध्येय बनले. त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःला घडवले आणि नंतर संपूर्ण भारताला नवे संविधान देऊन लोकशाही, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांची पायाभरणी केली.

आजच्या डिजिटल युगात शिक्षणाच्या असंख्य साधनांचा प्रसार झाला आहे. परंतु बाबासाहेबांनी ज्या अर्थाने शिक्षण घेतले, त्या अर्थाने आजचे शिक्षण बहुधा कमी पडते. त्यांनी शिक्षणाला केवळ नोकरी मिळविण्याचे साधन न मानता, सामाजिक परिवर्तनाचे शस्त्र मानले. विद्यार्थ्यांनी या दिवसाचा अर्थ समजून घ्यावा आणि बाबासाहेबांच्या जिद्दी, अनुशासन आणि विचारशक्तीचा अंगीकार करावा. त्यांचे जीवन आपल्याला शिकवते की परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, तरी ज्ञानप्राप्तीच्या इच्छेपुढे कोणतीही अडचण मोठी नसते.

शासनाने या दिवसाचे औचित्य लक्षात घेऊन राज्यभर विविध उपक्रम राबविण्याचे आवाहन केले आहे. अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या भाषण, वाचन, चित्रकला, निबंधलेखन या माध्यमातून बाबासाहेबांचा विचार तरुणाईपर्यंत पोहोचवला जातो. या उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान, मानवता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविणे हे उद्दिष्ट आहे. कारण बाबासाहेबांचा विचार हा केवळ एका वर्गापुरता मर्यादित नव्हता, तर तो संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी होता.

आज जेव्हा आपण "विद्यार्थी दिन" साजरा करतो, तेव्हा तो केवळ औपचारिक उत्सव न राहता चिंतनाचा दिवस व्हावा. बाबासाहेबांच्या शिक्षणदृष्टीत स्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य आणि सामाजिक जबाबदारी हे घटक महत्त्वाचे होते. त्यांनी नेहमीच शिक्षणात तर्क, प्रामाणिकता आणि करुणा यांचा संगम साधला. आजची पिढी जेव्हा शिक्षण घेत आहे, तेव्हा तिने हे लक्षात ठेवले पाहिजे की शिक्षणाचा खरा उद्देश व्यक्तिमत्त्वाचा विकास आणि समाजोन्नती आहे.

ज्ञानाच्या या क्रांतीदिनी आपण स्वतःला विचारुया की आपले शिक्षण समाजाला काय देत आहे. बाबासाहेबांच्या विचारांचा आत्मसात करुन आपण समाजात समता, बंधुता आणि प्रगतिवादाचा प्रसार करु शकतो. 7 नोव्हेंबरचा दिवस म्हणजे विद्यार्थ्यांसाठी नव्या प्रेरणेचा दिवस आहे— अडचणींचा विचार न करता शिक्षणाद्वारे उंच भरारी घेण्याचा संकल्प करण्याचा दिवस.

या दिवसाचे ऐतिहासिक, सामाजिक आणि शैक्षणिक महत्त्व लक्षात घेता शाळा-कॉलेजांनी या दिनाचे औचित्य अधिक प्रभावीपणे साजरे करावे. शिक्षकांनी बाबासाहेबांच्या जीवनचरित्रातून उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, परिश्रम आणि प्रामाणिकतेचे धडे द्यावेत. समाजात अजूनही अनेक ठिकाणी शिक्षणापासून वंचित घटक आहेत; त्यांच्यापर्यंत शिक्षण पोहोचविणे हीच बाबासाहेबांना खरी श्रद्धांजली ठरेल.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की 7 नोव्हेंबर 1900 हा दिवस केवळ एका मुलाच्या शाळेत प्रवेशाचा दिवस नव्हता, तर भारतीय समाजाच्या अंधारातून प्रकाशाकडे वाटचाल सुरु होण्याचा दिवस होता. म्हणूनच आजचा विद्यार्थी जर बाबासाहेबांच्या शिकवणुकीनुसार "शिका, विचार करा आणि परिवर्तन घडवा" या मंत्राचा अवलंब करेल, तर शिक्षणाचे खरे सार आणि बाबासाहेबांच्या ज्ञानक्रांतीचे स्वप्न साकार होईल.


संदर्भ:

1. शासन निर्णय – शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन, दि. 27 ऑक्टोबर 2017.
2. धनंजय कीर – Dr. Ambedkar: Life and Mission, Popular Prakashan, Mumbai.
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – Writings and Speeches, Vol. 1–17, Government of Maharashtra.
4. प्रतापसिंग हायस्कूल, सातारा – प्रवेश नोंदवही, 1900.


## आसरडोह येथे मुख्यमंत्री सौर कृषि वाहिणी येजनेचा सरपंच श्री रवि ( भैय्या ) देशमुख यांच्या हस्ते शुभारंभ

### - परिसरातील गावांना मिळणार चोविस तास लाईट



धारूर ( बाबुराव तिडके ) राज्य सरकारचा प्रकल्प मुख्यमंत्री सौर कृषि वाहिणी या योजनेचा शुभारंभ आसरडोह ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या परशुबा तांडा येथे गावचे सरपंच श्री रवि देशमुख व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला धारूर तालुक्यामध्ये पहिलाच राज्य सरकारचा हा प्रकल्प असल्याने रिलाईन्स कंपणी मार्फत सात एकरमध्ये हा प्रकल्प उभा राहात असुन या परिसरातील आठ गावे व शेतकऱ्यांना चोविस तास विज पुरवठा होणार आहे तसेच मजुरांना देखिल या प्रकल्पामध्ये काम मिळणार असल्याने हा प्रकल्प आसरडोह करिता संजिवणीच ठरणार आहे श्री रवि देशमुख यांच्या पाठपुराव्याने हा राज्याचा प्रकल्प धारूर तालुक्यात सर्वात आदि आसरडोह गावात आणल्यामुळे गावासह परिसरातील नागरिकांनी रवि देशमुख यांचे आभार मानले या प्रकल्पाच्या शुभारंभाला प्रोजेक्ट मॅनेजर श्री रोहित बनकर यांच्या सह गावचे सरपंच मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## आसरडोह जिल्हा परिषद सर्कलमध्ये श्री सुरेश ( नाना ) पिंगळे यांच्याच नावाची चर्चा



आसरडोह ( बाबुराव तिडके ) मा रमेशरावजी आडसकर साहेब यांच्या घराण्याशी एकनिष्ठ असणारे श्री सुरेश नाना पिंगळे यांनी आसरडोह जिल्हा परिषद लढवावी अशी मागणी या सर्कल मधील तमाम जनता करत आहे नाना सर्वांना बरोबर घेऊन चालणारे सर्वांशी प्रेमाचे नाते सतत जनतेच्या संपर्कात शांत संयमी मित्त - भाषी स्वभाव असल्याने सर्वांना आपलेसे वाटणारे नाना आसरडोह मोरफळी सुरणरवाडी रुई - धारूर आदि गावांचा नानांना पाठिंबा मिळत आहे त्यांनी त्या दृष्टीने प्रचार चालु केलेला असुन जनतेचा पाठिंबा देखिल त्यांना मिळत आहे श्री आडसकर साहेब यांचा पूर्ण राजकिय आशिर्वाद नाना पिंगळे यांना असल्याने नानांनी देखिल आसरडोह जिल्हा परिषद सर्कलची निवडणुक लढणारच म्हणून सुतोवात केल्याने त्यांच्या उमेदवारिला जनतेचे पाठबळ मिळत आहे

## मनोज जरांगे पाटील यांना झेड प्लस सुरक्षा देण्यासाठी केंद्र सरकारने महाराष्ट्र सरकारला निर्देश द्यावेत



वडवणी प्रतिनिधी

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे समाजाचे भूषण आहेत. त्यांचे रक्षण करणे जसे समाजाचे कर्तव्य आहे तसेच ती महाराष्ट्र सरकार आणि केंद्र सरकारची जबादारी आहे. प्राप्त परिस्थितीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या प्रकरणी गांभीर्याने विचार करून मनोज जरांगे पाटील यांना झेड प्लस सुरक्षा देण्यासाठी महाराष्ट्र सरकारला निर्देश द्यावेत, अशी मागणी लढा दुष्काळाशी चळवळीचे प्रणेते तथा मराठा आंदोलक ॲड.राज पाटील यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांची सुरक्षा सर्वोच्च आहे. समाजाला आरक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांचे योगदान इतिहास विसरणार नाही.मनोज जरांगे पाटील यांच्या जिविताची पूर्ण काळजी घेण्याची जबाबदारी समाजाने घेतली असली तरी राज्य, केंद्र सरकारने याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या प्रकरणी गांभीर्याने लक्ष देऊन जरांगे पाटील यांना झेड प्लस सुरक्षा देण्यासाठी महाराष्ट्र सरकारला निर्देश द्यावेत,अशी मागणी ॲड.राज पाटील यांनी केली आहे.

*रचलेल्या कटाची कसून चौकशी करावी

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचल्याची माहिती पुढे येत असल्याने राज्यात खळबळ उडाली असून समाजात चिंता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर हत्येच्या कटाची कसून चौकशी करून या प्रकरणाचा छडा लावावा आणि दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी ॲड. राज पाटील यांनी केली.

## विद्यार्थी दिन म्हणजे ज्ञान, समता आणि संघर्षाचा प्रेरणादिन— श्री. दीपक तांदळे

### ➡ संस्कार प्राथमिक शाळा विद्यानगर विभागात विद्यार्थी दिन उत्साहात साजरा



परळी (प्रतिनिधी) – शहरातील श्री पद्मावती शिक्षण संस्था संचलित संस्कार प्राथमिक शाळा, विद्यानगर विभागात विद्यार्थी दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री. कैलास तांदळे (अध्यक्ष,श्री पद्मावती शिक्षण संस्था) यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून श्री. दीपक तांदळे (सचिव, श्री पद्मावती शिक्षण संस्था), श्री अनकाडे सर ( मुख्य कार्यकारी अधिकारी श्री पद्मावती शिक्षण संस्था) तसेच श्री. अमरशील गायकवाड सर (प्र. मुख्याध्यापक, संस्कार प्राथमिक शाळा) उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व शिक्षणमहर्षी कै. विठ्ठलरावजी तांदळे सर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी आपल्या प्रेरणादायी मनोगतात सचिव श्री. दीपक तांदळे म्हणाले, "आज 7 नोव्हेंबर हा दिवस संविधान शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळा प्रवेश दिनाच्या स्मरणार्थ विद्यार्थी दिन म्हणून साजरा केला जातो. ज्ञानाच्या जगात त्यांनी टाकलेले पहिले पाऊल... म्हणजे 7 नोव्हेंबर ! आणि हाच दिवस आज आपण प्रेरणादिन म्हणून पाळतो. बाबासाहेबांचे बालपण अत्यंत कठीण परिस्थितीत गेले. समाजातील अन्याय, भेदभाव, अंधश्रद्धा या अडथळ्यांचा सामना करत त्यांनी शिक्षणाचा प्रकाश आपल्या आयुष्यात आणला. त्या काळात शाळेत प्रवेश मिळवणे हीच मोठी लढाई होती पण त्यांच्या जिद्दीने ही लढाई जिंकली आणि इतिहास घडवला.डॉ. आंबेडकर म्हणत: "शिक्षण हेच खऱ्या स्वातंत्र्याचे अद्वितीय शस्त्र आहे."त्यांनी फक्त स्वतःला शिक्षित केले नाही, तर संपूर्ण समाजासाठी शिक्षणाची दारे उघडली. त्यांनी कोलंबिया विद्यापीठ, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अशा जगप्रसिद्ध विद्यापीठांत शिक्षण घेऊन जागतिक पातळीवर भारताचा सन्मान वाढवला. तरीही ते म्हणत: "मी आयुष्यभर विद्यार्थीच आहे."प्रिय मित्रांनो,विद्यार्थी हे राष्ट्राचे भविष्य आहेत. भविष्यातील डॉक्टर, अभियंते, शास्त्रज्ञ, पोलीस, सैनिक, नेते — हे आजच्या वर्गखोल्यांतच घडतात. म्हणूनच विद्यार्थी दिनाचा मुख्य उद्देश आहे शिक्षणाची आवड निर्माण करणे, समता, बंधुता आणि ज्ञानाची कास धरणे,वाचन संस्कृती वाढवणे, स्वप्नांकडे धैर्याने वाटचाल करणे. चला तर...बाबासाहेबांच्या संघर्षातून शिकूया,त्यांच्या जिद्दीचा वारसा जपूया,आणि आपल्या व समाजाला उन्नत करण्याचा संकल्प आज इथून करूया!"

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सोळंके सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. लहाणे सर यांनी मानले. कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षकवृंद, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

## पान 4 वरुन

ओबीसींच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या बाबतीत बोललो, तेव्हापासून मला कामापेक्षा जास्त टार्गेट केले जात आहे. ओबीसींच्या न्यायाची आणि गरजू व गरीब मराठा विद्यार्थ्यांची वैचारिक बाजु मांडली म्हणून मला संपवायला निघालेत, असा थेट आरोप धनंजय मुंडे यांनी केला.

आज घात पाताच्या गोष्टी करणाऱ्यांनी माणसात माणूस ठेवला नाही. झुंड आणि दादागिरी करून राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांना शिव्या, भुजबळ साहेबांना शिव्या, मला शिव्या, पंकजाताई ला शिव्या, लक्ष्मण हाकेंवर हल्ला, नवनाथ वाघमारे यांच्या वर हल्ला, त्या पवन करवरचा तर जीव घ्यायला निघाले होते, ते कुणाचे समर्थक होते? जीवघेणे हल्ले करून त्याचे समर्थन करत मारहाणीचा असुरी आनंद घेणारे लोक तुमचेच होते, असा घणाघात करत धनंजय मुंडे यांनी आणखी एक मुद्दा उपस्थित केला. मनोज जरांगे ऑन एअर धनंजय मुंडे संपवून टाकतो, त्याचा नायनाट करतो, त्याची संपूर्ण जात संपवून टाकतो, ओबीसी नेत्यांना संपवून टाकतो, ब्राम्हणांना संपवून टाकतो, अशी उघड धमकी दिली जाते, ही धमकी नाही का? त्यावर सरकार कारवाई करणार नाही का? सरकार त्यांचे सर्व काही ऐकते मग आम्ही ओबीसी म्हणून आम्हाला किंमत नाही का? असा सवाल करताना धनंजय मुंडे यांनी जरांगेना आव्हान देत मला गोळ्या घालून मारुन टाका, माझा समाज, ओबीसी समाज सगळ्यांना गोळ्या घालून मारुन टाका आणि तुम्ही एकटेच राज्य करा, असे भावनिक आवाहन केले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी घालून दिलेला गावगाडा, सामाजिक विन विस्कटनार नाही यासाठी अनेकवेळा आरोप होऊन देखील मी गप्प राहिलो, जरांगे यांना सरकारचा प्रतिनिधी म्हणून दोनदा भेटलो, पण कधीच त्यांना कुठे विरोध केला नाही, विरोध हा केवळ आरक्षणाच्या विचारापुरता मर्यादित होता मात्र मनोज जरंगे या व्यक्तीला धनंजय मुंडे हा व्यक्ती पृथ्वीतलावर जिवंत नको आहे असे वाटते असे धक्कादायक विधान धनंजय मुंडे यांनी केले. त्याचबरोबर मनोज जरांगे आणि त्यांच्या वाळू माफिया टोळी कडून आपल्याही जीवाला धोका असल्याचे धनंजय मुंडे यांनी यावेळी म्हटले.

मनोज जरांगे यांना काही नेत्यांनी झेड प्लस दर्जाची सुरक्षा देण्याची मागणी केली आहे, मी तर या पत्रकार परिषद व्दारे या संपूर्ण प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याबरोबरच देशातील सर्वात सेफ समजली जाणारी एसपीजी सुरक्षा जरांगेना द्यावी, अशी मागणी सरकारकडे करतो, सोबतच ओबीसी समाजाच्या लढ्यातील छगन भुजबळ साहेब, गोपीचंद पडळकर साहेब, लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे, किंवा माझ्यासारखा सामान्य कार्यकर्ता अशा लोकांचे जीव वाचावेत, याचीही काळजी सरकारने घ्यावी आणि राहिला विषय मला संपवायचा तर इथल्या मातीतील लोकांच्या पदरी माझ्या आई वडिलांनी मला वाहिलेले आहे, त्यामुळे लोकांच्या मध्ये राहून माझा जीव गेला तरी मला फरक पडत नाही, असे भावनिक विधान धनंजय मुंडे यांनी केले आहे.

दरम्यान तुमचेच लोक प्लॅन करुन पाठवून त्यांनी ओळखी करायच्या काहीतरी कामे सांगायची, गाड्या तर मला अनेकजण मागतात, अनेक आंदोलने झाली तेव्हा मी अनेकांना गाड्यांची व्यवस्था करुन दिली आहे, त्याचा अर्थ जीव घेण्याची प्लॅनिंग? म्हणजे निव्वळ थोतांडगिरी आहे, असे सांगताना आजकाल ए आई तंत्रज्ञानाने काहीही बनावट केले जाते, त्यामुळे काही बनावट रेकॉर्डिंग, व्हिडीओ किंवा काही तयार करुन माझ्यावर एका समाजाकडून हल्ले घडवून आणण्याचा व मला संपवण्याचा हा कट असल्याचे धनंजय मुंडे यांनी यावेळी स्पष्ट केले. त्यामुळे आता या प्रकरणातील संपूर्ण सत्य बाहेर यावे, तोपर्यंत मी स्वस्थ बसणार नाही आणि बसुही देणार नाही, असेही धनंजय मुंडे यांनी ठासून सांगितले.

यावेळी माजी आ. संजय भाऊ दौंड, ज्येष्ठ नेते दत्ता आबा पाटील, युवक नेते अजय मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेस परळीचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, परळीचे शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, शकील कुरेशी, सूर्यभान नाना मुंडे, पिंटू मुंडे, प्रा. मधुकर आगाव, विनोद जगतकर, राजाभाऊ पोळ, लक्ष्मण पोळ, अय्युब भाई, माणिक भाऊ फड, अनंत इंगळे यांसह पदाधिकारी आदी उपस्थित होते.

----------------------------------------------

देशातील एकही शेतकरी आत्महत्या करणार नाही. भारताचा कृषीमंत्री म्हणून मी आपल्या लढाईत सहभागी आहे. शेतकऱ्यांसाठी काम करणे हासुद्धा एक फार मोठा संघर्ष आहे. एक युद्ध गरिबीच्या विरोधात, एक युद्ध लाचारी आणि हतबलतेच्या विरोधात लढूया आणि येणाऱ्या भविष्यकाळात हातात हात घेऊन काम करूया. केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे असा विश्वास केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी उपस्थित हजारो शेतकऱ्यांना दिला. तर ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी म्हणाले की, ब्रिटिशांच्या काळात फोडा आणि राज्य करा अशी निती होती. आज देशाला स्वातंत्र्य मिळून कित्येक वर्षे झाली तरीही आपण विभागलेलेच आहोत. पक्षात, प्रदेशात, जातीत अशा आपल्या विभागण्या झाल्या आहेत. आज आपल्याला "शेतकरी" म्हणून एकत्र यायला पाहिजे. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी झाली त्यात शेतकऱ्यांची पिके तर वाहून गेलीच मात्र मातीही वाहून गेल्याने त्यांची स्वप्नेही वाहून गेली. अगोदरच शेतकरी अस्मानी संकटांच्या गर्तेत असताना त्यात सुलतानी संकटेही त्याला सोडत नाहीत. शेतकऱ्यांना हमीभाव मिळत नसल्याने कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकरी संकटात आहे. एक रुपयाही उत्पन्न मिळत नसतांना तो जगतो कसा? हाच प्रश्न मला पडलेला असल्याचे त्यांनी म्हटले. सिरसाळा येथे ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मराठवाड्याच्या विविध भागांतून हजारो शेतकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे कार्यक्रमास उपस्थिती लावली. शेती संलग्न आस्थापनांचे विविध स्टॉल्सही कार्यक्रमस्थळी उभारण्यात आले होते. विविध गावांतील यशस्वी शेतकऱ्यांचा सन्मानही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

शेतकऱ्यांचे जीवन हे अतिशय कष्टप्रद आणि संघर्षाचे जीवन आहे. आम्ही शासन म्हणून तर त्यांच्या पाठीशी उभे राहूच मात्र परिवर्तन घडवण्यासाठी सर्वांचाच सहभाग महत्वाचा असतो. सामाजिक संस्था म्हणून ग्लोबल विकास ट्रस्ट जे काम करत आहे ते वाखाणण्याजोगे आहे. पाणी नसलेल्या ओसाड मालावर फुल उमलावे तसेच काम ही संस्था महाराष्ट्राच्या आणि मराठवाड्याच्या भूमीत करत आहे. म्हणून "कृषीकुल एक फुल" असा उल्लेख केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केला.

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतकरी हा त्याचा आत्मा आहे. कृषीमंत्री म्हणून शेतकऱ्यांची सेवा करणे म्हणजे ईश्वरसेवा करणे आहे असे मी समजतो. लोकशाहीतील सर्व व्यवस्था आणि पदे ही लोकसेवेसाठी असतात. जनसेवा हीच ईश्वरसेवा याच भावनेने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आम्ही लोकांचे जीवन बदलण्याचे प्रयत्न करत आहोत. काही कामे शासन करते तर काही कामे लोकांना करावी लागतात. शेतकऱ्यांचे एकरी उत्पन्न वाढले पाहिजे, पहिल्यांदा आम्ही जे शास्त्रज्ञ प्रयोगशाळेत बसून काम करत होते त्यांना बांधावर जाऊन संशोधन करायला सांगितले. याचा अत्यंत प्रभावी परिणाम दिसून आला आणि काही महत्त्वपूर्ण निष्कर्ष समोर आले. यावर्षी अतिवृष्टी झाली आणि पिके वाहून गेली. पिके वाहून गेली म्हणजे तेवढेच नुकसान होत नाही तर त्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाची स्वप्ने वाहून जातात.

मी आपल्याला विश्वास देतो की केंद्र सरकार आणि राज्य सरकार मिळून आपल्याला मदत करणार आहोत. राज्य सरकार त्यांचा हिस्सा खर्च करेल तर केंद्र सरकार आपत्ती निवारण विभागाचा वेगळा निधी शेतकऱ्यांना मदत म्हणून त्यांच्या खात्यात वर्ग करेल. शेतकऱ्यांना मदत करतांना आम्ही कुठेही कमी पडणार नाही. एवढेच नाही तर पीकविमा विभाग माझ्या मंत्रालयाच्या अंतर्गत येत असल्याने शेतकऱ्यांना योग्य मोबदला पिकविण्याच्या माध्यमातून मिळावा यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. झालेल्या नुकसानीचा एक एक रुपया आम्ही शेतकऱ्यांना देऊ. कोरडा आणि ओल्या दुष्काळाचा सक्षमपणे सामना करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभी करण्याचा आमचा संकल्प आहे. बियाणे खरेदीचे अनुदान शेतकऱ्यांच्या थेट खात्यावर वर्ग करण्याचा विचार आम्ही करत आहोत. मात्र यासाठी त्यांच्याकडून सूचना मागवत आहोत. त्याद्वारे प्रभावी योजना भविष्यात बनवली जाईल.

शेतीची उत्पादन क्षमता घटत असल्याने गो आधारित शेती तसेच पर्यावरण पूरक शेती करण्यासाठी काय करता येईल याचा विचार आम्ही करत आहोत. सेंद्रिय शेतीचे ग्लोबल विकास ट्रस्टने केलेले प्रयोग आम्ही देशभर "मॉडेल" म्हणून घेऊन जाणार आहोत. पारंपरिक शेतीतून शाश्वत शेतीकडे शेतकऱ्यांना घेऊन जाण्याचे काम मयंक गांधींच्या नेतृत्वाखाली ग्लोबल विकास ट्रस्टने केले आहे याबद्दल त्यांचे खूप खूप अभिनंदन. शेतीची पद्धत बदलली तर शेतकऱ्यांचे जीवन बदलेल. म्हणूनच केंद्र सरकार यापुढे ग्लोबल विकास ट्रस्ट सोबत काम करणार आहे.

तुमच्यामध्ये राहून मला आता सात वर्षे झाले.... माझे वडील गुजरात वरुन आले होते. माझ्या अनेक पिढ्या मुंबईमध्ये गेल्या. मी इथे राहिलो तेंव्हा मी.कधी तुमचा होऊन गेलो मलाच कळले नाही. या देशात परळीसारखे माणुसकी असलेली माणसे पहिली नाहीत.

ब्रिटिशांच्या काळात फोडा आणि राज्य करा अशी निती होती. आज देशाला स्वातंत्र्य मिळून कित्येक वर्षे झाली तरीही आपण विभागलेलेच आहोत. पक्षात, प्रदेशात, जातीत अशा आपल्या विभागण्या झाल्या आहेत. आज आपल्याला "शेतकरी" म्हणून एकत्र यायला पाहिजे.ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी झाली त्यात शेतकऱ्यांची पिके तर वाहून गेलीच मात्र मातीही वाहून गेल्याने त्यांची स्वप्नेही वाहून गेली. अगोदरच शेतकरी अस्मानी संकटांच्या गर्तेत असताना त्यात सुलतानी संकटेही त्याला सोडत नाहीत. शेतकऱ्यांना हमीभाव मिळत नसल्याने कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकरी संकटात आहे. एक रुपयाही उत्पन्न मिळत नसतांना तो जगतो कसा? हाच प्रश्न मला पडलेला आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या अनेक समस्या आहेत. संकटातील शेतकऱ्यांना राज्य सरकारला बोलून मदत करायला हवी. यंदाच्या झालेल्या अतिवृष्टीने शेतकरी पूर्णतः खचला असल्याने शेतकऱ्यांची कर्जमाफी करायला हवी अशी माझी विनंती आहे. आम्ही शेतकऱ्यांना फळबाग लागवड करण्यासाठी प्रोत्साहित करत आहोत. लागवड करायला पैसे नसतील तर शेतकऱ्यांना ए. यू.बँकेच्या मार्फत अर्थसहाय्य आम्ही करणार आहोत. त्याचसोबत कृषीकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्रातून मोफत प्रशिक्षणसुद्धा देणार आहोत.

आजचा दिवस हा आपला दिवस आहे... सिरसाळा येथे येऊन मी खूपच खुश आहे. संकटातही शेतकऱ्यांमधील उत्साह वाखाणण्याजोगा आहे.

शिवराज सिंह चौहान हे मंत्री बिलकूल आहेत परंतु ते अगोदर शेतकरी आहेत. शेतीविषयी प्रचंड आत्मियता असलेले व्यक्तिमत्व आपल्या देशाला कृषीमंत्री म्हणून लाभले आहेत. ग्लोबल विकास ट्रस्टने केलेले काम त्यांना पहायचे होते. शेतकऱ्यांच्या विकासाचे हे मॉडेल त्यांना संपूर्ण देशात पोचवायचे आहे म्हणून ते इथे आले, त्यांनी ग्लोबल विकास ट्रस्टच्या टीम सोबत चर्चा केली आणि कामाचे स्वरुप जाणून घेतले.

महाराष्ट्राची शेती ही अतिशय वेगळ्या स्वरुपाची आहे. कृषी क्षेत्रातील नाविन्यपूर्ण बदल होऊ घातले आहेत. शेतकऱ्यांमध्ये बदलाची भावना रुजवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मयंक गांधी व ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून होत आहे. आधुनिक शेतीसाठी आता कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्राचा वापर केला जातोय हे अतिशय विशेष आहे.जलनायक मयंक गांधी यांनी परळीत पाऊल ठेवले. इथल्या लोकांच्या हाल अपेष्टा पहिल्या, समजून घेतल्या. हे पाहिल्यानंतर त्यांच्या मनाला अतिशय वेदना झाल्या आणि त्यांनी संकल्प केला की, मी या लोकांचे जीवन बदलल्या शिवाय इथून जाणार नाही. त्यांनी मुंबईचे स्वतःचे घर विकले आणि त्यातून त्यांनी इथे समाजसेवेला सुरुवात केली. "मैं चलता गया कारवां बनता गया..." या हिंदीतील उक्तीप्रमाणे एकेकजण सोबत येत गेला आणि त्यातूनच ग्लोबल विकास ट्रस्ट परिवार वाढत गेला.

----------------------------------------------------------

केले आहेत. अमोल खुणे यांच्या पत्नी म्हणाल्या,एक महिन्यापासून माझ्या पतीला दारु पाजत होते. त्या नशेमध्ये त्यांच्याकडून हे सगळे करून घेतले जात होते. मात्र माझे पती मराठा आंदोलक जरांगे पाटलांचे सुरुवातीपासून कार्यकर्ते आहेत. त्यांच्या मोबाईलमध्ये व स्टेटसला नेहमी जरांगे पाटलांचे फोटो असतात. ते जरांगे पाटलांना देव मानतात. माझ्या पतीला या प्रकरणात अडकवले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.यावेळी खुणे यांच्या आईनेही प्रतिक्रिया दिली. त्यांनी माझ्या मुलाचा प्रकरणात काहीही संबंध नसल्याचा दावा केला. यावेळी खुणे यांच्या आईला आणि पत्नीला अश्रू अनावर झाले. दरम्यान, प्रकरणाने जिल्ह्यासह राज्यात खळबळ उडाली आहे.जरांगे पाटील यांना जीवे मारण्याचा कट रचण्याच्या प्रयत्नात असणाऱ्या दोघांना जालना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. या दोन जणांनी जरांगे पाटील यांना जीवे मारण्याचा कट रचत असल्याची तक्रार जालना पोलिसांकडे बीडच्या काही कार्यकर्त्यांनी केली होती. या तक्रारीवरुन ही कारवाई केली. माझं आणि धनंजय मुंडेचं वैर नाहीये. त्याने जी घटना करायला नको होती, ती त्याने केली आहे. हा चेष्टेचा विषय नाही. त्याने परिस्थिती मर्यादेच्या पुढे नेली आहे. राजकारण आणि आरक्षण एकत्र करण्याची गरज नाही", असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांना आव्हान दिले. मी नार्को टेस्ट करण्यासाठी अर्ज करणार, असेही प्रत्युत्तर जरांगेंनी मुंडेंना दिले आहे. मनोज जरांगे यांनी धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप केला. धनंजय मुंडेंनी मला मारण्याची अडीच कोटी रुपयांमध्ये सुपारी दिली, असे जरांगे म्हणाले. त्यांनी कांचन नावाच्या व्यक्तीचाही उल्लेख केला. तो धनंजय मुंडेंचा पीए असल्याचेही जरांगे म्हणाले.

धनंजय मुंडे यांनी उत्तर दिल्यानंतर मनोज जरांगे यांनी पत्रकार परिषद घेत उत्तर दिले. "मला माहिती मिळाली होती. ती मी पोलिसांना दिली. घातपाताच्या प्रकरणात आठ ते दहा जण आहेत. त्यात धनंजय मुंडे पण आहे. त्या प्रकरणाची चौकशी व्हायला नको का?", असे जरांगे म्हणाले. "धनंजय मुंडे नार्को टेस्ट करायची म्हणत असतील, तर मी नार्को टेस्ट करुन घ्यायला तयार आहे. उद्या मी गृह मंत्रालयात, न्यायालयात, पोलीस अधीक्षक कार्यालयात, जिल्हाधिकारी कार्यालयात जाणार आणि नार्को टेस्ट करण्यासाठी अर्ज करणार. धन्या मी तुझ्यासारखा नाहीये. मी जातवाण आहे. मी असे खुनाचे, घातपाताचे आरोप करु शकत नाही. नार्को टेस्टला सगळ्यात आधी जाईल, तू काय सीबीआयची मागणी करतो?, अशी टीका जरांगेंनी धनंजय मुंडेंवर केली आहे.--------
-------------------------

सांगितलेला घटनाक्रम धक्कादायक आहे. जरांगे पाटील याबाबत म्हणाले, हत्येसाठी तब्बल अडीच कोटी रुपयांची सुपारी ठरली होती, त्यापैकी 50 लाख रुपये देण्यात आले होते. बीडमधील कांचन नावाचा व्यक्ती धनंजय मुंडे यांचा पीए (कार्यकर्ता) आहे. त्याने दोन आरोपींपैकी एका आरोपीला त्याने परळीला नेले होते. त्यानंतर भाऊबीजेच्या दिवशी झाल्टा फाटा येथे धनंजय मुंडे यांनी या आरोपींची भेट घेतली. 'आम्ही त्याला ठोकतो' असे आरोपींनी सांगितल्यावर, मुंडे यांनी 'मी जुनी गाडी देतो' असे आश्वासन दिले. "या घातपाताच्या कटाचे मूळ धनंजय मुंडे आहे." असा दावा जरांगे यांनी केला. तसेच खून करून राजकारणामध्ये माणूस मोठा होत नाही. हा प्रकार गंभीर आहे, सर्वांनी हुशार होणे गरजेचे आहे, असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले.मराठा समाजाला शांत राहण्याचे आवाहन करताना जरांगे पाटील यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. "तुम्ही शांत राहा म्हणजे मला सुखाचे दिवस आणता येईल... हा नायनाट नक्की करू. आपण बेसावध असतो तर घटना घडून गेली असती, मी सतर्क होतो म्हणून मी त्यांचा बाप ठरलो," असे अत्यंत भावनिक आणि रोखठोक विधान त्यांनी केले.जरांगे पाटील यांनी केवळ मराठा नेत्यांनाच नव्हे, तर राज्यातील सर्व ओबीसी नेते आणि मुस्लिम नेत्यांनाही या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेण्याची विनंती केली. "विरोधात भाषण करणारा परवडला, पण जीव घेणारा नाही. आज माझ्यावर बेतली, उद्या तुमच्यावर बेतल," असा इशारा देत त्यांनी 'यांचा नायनाट करणे गरजेचे आहे,' असे ठणकावून सांगितले. या गंभीर आरोपांमुळे राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे, आणि आता धनंजय मुंडे या आरोपांना काय प्रत्युत्तर देतात, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची हत्या करण्याचा कट रचून अडीच कोटींची सुपारी दिल्याची तक्रार बुधवारी रात्री पोलिस अधीक्षकांकडे देण्यात आली. स्वत: जरांगे पाटील यांनीही बुधवारी मध्यरात्री पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांची भेट घेऊन चर्चा केली. तक्रारीनुसार पोलिसांनी तातडीने पावले उचलत गेवराईतून दोन संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. या प्रकरणानंतर जरांगे पाटील यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे.

---------------------------------------------

नागरिकांनी त्रासही सहन केला चांगली गटारी योजना होईल असे वाटले परंतु शहराच्या रस्त्याचं वाटोळ केले आज तागातही ती भुयार कटर योजना अधुरीच असून तो लाडका जावई गुत्तेदार लड्डा बेपत्ता झाला की काय असा प्रश्न उद्भवत आहे. नगरपरिषदेच्या सत्तेवर असणाऱ्या नगराध्यक्ष नगरसेवक बांधकाम सभापती व त्यांच्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या नेत्यांना पुन्हा नगरपरिषदेवर जाण्यासाठी परळीकरांना मतदान मागण्याचा काय अधिकार राहतो. किंवा परळीकरांनी तरी यांना का मतदान करावे असाही सवाल परळी शहराध्यक्ष बहादुर भाई यांनी केला आहे.

----------------------------------

विद्यार्थी दिन साजरा केला. यावेळी श्री गायकवाड बोलत होते.

7 नोव्हेंबर हा दिवस विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सातारा येथील प्रतापसिंह भोसले हायस्कूल मधील शाळा प्रवेश दिन देशात विद्यार्थी दिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने परळी येथील शक्तीकुंज वसाहतीतील नवीन प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी हा दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करुन साजरा केला. यानिमित्त रेल्वे स्टेशन येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील प्रांगणात विद्यार्थी एकत्र आले होते. विद्यार्थ्यांनीच पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. त्यानंतर जेष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड, तसेच वैद्यनाथ बँकेचे माजी संचालक प्रा. दासू वाघमारे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी बोलतांना प्रा.दासू वाघमारे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखे शिक्षण घेऊन आपल्या शाळेचे व आई वडिलांचे नाव मोठे करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी रानबा गायकवाड यांच्या वतीने विद्यार्थ्यांना पेन व वहीचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन पर्यवेक्षक एल.आय.वाकडे यांनी केले. श्री शिंदे मोहेकर यांनीही यावेळी विचार मांडले. कार्यक्रमास शिक्षक सर्वश्री विनोद देशमुख, भागवत मुंडे, यांच्यासह शिक्षिका सौ.आर.आर.जाधव, सौ.आयोध्या राऊत, सौ.भाग्यश्री गंगणे, सौ.शुभांगी मुंडे यांच्यासह 170 विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संयोजन एल.आय.वाकडे यांनी केले. मुख्याध्यापक डी.जी.शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री कांदे, बाळू बने, रणजीत घनघाव, श्री चांगिरे आदींनी परिश्रम घेतले. दरम्यान, यावेळी दिवाळीनिमित्त शाळेने आयोजित केलेल्या आकाश कंदिल बनवण्याच्या स्पर्धेतील विद्यार्थ्यांना श्री गायकवाड, श्री वाघमारे, एल.आय.वाकडे, श्री शिंदे यांच्या हस्ते पारितोषिकाचे वितरण यावेळी करण्यात आले.

-----------------------------------

वेळी राहुल सोनवणे यांना सारणी येथे गावकऱ्यांसमोर शब्द दिला होता की, जिल्हा परिषद निवडणुकीत (Zilla Parishad Election) त्यांना संधी मिळाल्यास ते मदत करतील.

युसुफ वडगाव गटात 'हायव्होल्टेज' स्थिती:

हा गट सर्वसाधारण (General) असून, राहुल सोनवणे याच गटातून इच्छुक आहेत.

खा. बजरंग सोनवणे यांचे सुपुत्र सौरव सोनवणे यांनी याच गटातून निवडणूक लढवण्याचे संकेत देत गावदौरे सुरु केले आहेत.

यामुळे खा. सोनवणे हे पुत्रप्रेमापोटी लोकसभा निवडणुकीत दिलेला शब्द फिरवणार की, आघाडी धर्म पाळून राहुल सोनवणे यांना मदत करणार, हा मोठा प्रश्न आहे.

कार्यकर्ता की पुत्रप्रेम?

लोकसभा निवडणुकीनंतर विजयी भाषणात खा. सोनवणे यांनी सांगितले होते की, "माझ्या कुटुंबातील आता कोणीही जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद लढणार नाही. यापुढे कार्यकर्त्यांना संधी दिली जाईल."

आता त्यांच्याच मुलाने निवडणूक लढवण्याची तयारी दर्शवल्याने, कार्यकर्त्यांना संधी देण्याचे आश्वासन पाळले जाते की, पुत्रप्रेम जिंकते, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईल.

कार्यकर्त्यांचा संताप:

खासदार, आमदार जर स्वतःच्याच कुटुंबीयांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पुढे आणणार असतील, तर कार्यकर्त्यांनी फक्त सतरंज्या उचलायच्या का? असा सवाल सर्वपक्षीय कार्यकर्ते विचारत आहेत. नेत्यांच्या मुलांसाठी कार्यकर्त्यांच्या जागा सोडल्या जात असतील, तर आशा नेत्यांना त्यांची जागा दाखवून देण्याची वेळ आल्याचे मतही अनेक कार्यकर्ते व्यक्त करत आहेत.

खा. बजरंग सोनवणे आपला राजकीय इतिहास बदलतात की नाही, याकडे केवळ सारणी गावचेच नव्हे, तर संपूर्ण केज मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.

--------------------------------------

नेहमी समाजहित आणि शहर विकासाला प्राधान्य दिले आहे. स्वतःसाठी काहीही न मागता त्यांनी अंबाजोगाई शहराच्या सर्वांगीण विकासासाठी दिवसरात्र परिश्रम घेतलेले आहेत."

त्यामुळे आगामी निवडणुकीत काकाजींच्या नेतृत्वात नगरपालिकेत एकहाती सत्ता यावी यासाठी संपूर्ण बागवान समाज शंभर टक्के काकाजींच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील आणि त्यांना नगराध्यक्ष म्हणून प्रचंड मतांनी विजयी करेल, असा ठाम निर्धार यावेळी समाज बांधवांनी व्यक्त केला.

या महत्त्वपूर्ण भेटीदरम्यान अंबाजोगाई शहरातील माजी उपनगराध्यक्ष रहीम भाई शेख, नूर पटेल साहेब यांच्यासह समाजातील सर्व प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-----------------------------------------

पार्थ पवार यांना पूर्ण म्हणजे सहा कोटी रुपये स्टॅम्प ड्युटी भरावी लागण्याची शक्यता आहे.पार्थ पवार यांच्यावर जमीन घोटाळ्याचा आरोप करण्यात आला आहे, पुण्यातील 1800 कोटी रुपये किंमतं असलेली जमीन ही 300 कोटी रुपयांना खरेदी केल्याचा आरोप होत आहे, तसेच या व्यवहारावर स्टॅम्प ड्यूटी म्हणून अवघे 500 रुपये भरण्यात आले आहेत, 300 कोटी रुपयांच्या व्यवहारावर सरकारी नियमांनुसार सहा कोटी रुपयांचं मुद्रांक शुल्क होत असताना अवघ्ये 500 रुपयेच भरण्यात आल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे पार्थ पवार यांच्या अडचणी वाढल्या आहेत. दरम्यान हा व्यवहार रद्द करण्यासाठी अमेडिया कंपनीकडून अर्ज करण्यात आला होता, तो अर्ज देखील फेटाळून लावण्यात आला आहे, जोपर्यंत मुंद्राक शुल्क भरल्या जात नाही, तोपर्यंत अर्ज स्विकारता येणार नसल्याचं म्हटलं आहे. त्यामुळे आता पार्थ पवार यांच्या अडचणी वाढताना दिसत आहेत.

---------------------------------------------

आली आहे. हे जरी झालं तरी जी क्रिमीनल केस दाखल झाली आहे, ती याने संपणार नाही. या प्रकरणात ज्या अनियमितता आहेत, त्याला जो कोणी जबाबदार असेल त्याच्यावर पुढील कारवाई होईल."याबरोबर अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अंतर्गत समितीची जी समांतर चौकशी सुरु आहे, त्याअंतर्गत चौकशी करुन त्याचा अहवाल एक महिन्यात घेऊ, त्यामध्ये याची किती व्याप्ती आहे. यामध्ये अजून कोण-कोण आहे याची महिती मिळेल, त्यानुसार पुढील कारवाई केली जाईल, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत.पार्थ पवारांना अभय दिला आणि बाकीच्यांवर गुन्हे दाखल केले गेले असा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. याबद्दल देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारण्यात आला. उत्तर देताना फडणवीस म्हणाले की, "ज्यांना एफआयआर हा काय असतो हे समजत नाही असेच लोकं अशा प्रकारचा आरोप करु शकतात. एफआयआर दाखल करत असताना ज्या एक्सप्रेस्ड पार्टीज (करारात सहभागी असलेले लोक) असतात त्यांच्यावर एफआयआर दाखल होतो. त्या कंपनीचे ऑथराइज्ड सिग्रेटरी आहेत, त्यांच्यावरच एफआयआर दाखल होतो, तो एफआयआर दाखल झाला आहे."जेव्हा एखादा एफआयआर होतो, तेव्हा त्यामध्ये ज्यांनी सही केली ते, ज्यांनी विक्री केली ते, ज्यांनी चुकेचे रजिस्ट्रेशन केलं ते अशा सर्वांवर हा एफआयआर दाखल झालेला आहे. चौकशी दरम्यान अजूनही कोणाची नावे आली, कोणाचा संबंध आला तर त्यांच्यावरही कारवाई होत असते. आता जो एफआयआर केला आहे, त्यामध्ये कोणालाही डावललेलं नाही. नियमानुसार ऑथराइज्ड सिग्रेटरी, नियमानुसार पॉवर ऑफ अटॉर्नी होल्डर हे एफआयआरचे जबाबदार असतात, त्यांना जबाबदार धरलं आहे," असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

-----------------------------------------

## केज शहराच्या विकासाला नवी दिशा! 6.30 कोटींचा निधी मंजूर ... गटनेते हारुणभाई इनामदार



प्रकाश मुंडे/केज प्रतिनिधी नगरपंचायतच्या माध्यमातून शहराच्या विकासासाठी जिल्हा नियोजनमधून तब्बल 6 कोटी 30 लक्ष रुपयांचा विक्रमी निधी मंजूर झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित दादा पवार पक्ष) पक्षाचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार आणि कर्तव्यदक्ष नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड यांच्या अथक प्रयत्नांना हे मोठे यश मिळाले आहे.

गेल्या काही वर्षांपासून केज शहर विकासापासून दूर होते, मात्र आता हा निधी शहराचा विकास साधण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

दलितेत्तर आणि दलित वस्त्यांचा विकास: मंजूर निधीमध्ये महाराष्ट्र नगरोत्थान महाबियन जिल्हास्तरीय, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना आणि नागरी दलिततेत्तर वस्ती सुधार योजना या तीन प्रमुख योजनांचा समावेश आहे. अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांच्या वस्तीमध्ये मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी तसेच शहराच्या अन्य भागातील मूलभूत कामांसाठी हा निधी वापरला जाईल.पाणी प्रश्नावर तोडगा: 129 कोटींची पाणीपुरवठा योजना तांत्रिक मंजुरीच्या अंतिम टप्प्यात असून लवकरच प्रत्यक्ष काम सुरु होईल, असे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार यांनी सांगितले.स्वच्छता अभियानावर भर: शहराच्या स्वच्छतेसाठी स्वच्छतागृहे बांधण्याचा निर्धार असून 'स्वच्छ शहर सुंदर शहर' हे उद्दिष्ट गाठले जाईल.मान्यता आणि आभार: जिल्हा अधिकारी कार्यालयाच्या नगरपरिषद प्रशासन विभागाने एकाच दिवशी तीन प्रमुख योजनांतील कामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, आमदार नमिताताई मुदडा, खासदार रजनीताई पाटील आणि रमेश रावजी आडसकर यांच्या प्रयत्नांमुळे हा निधी उपलब्ध झाल्याचे सांगून त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.प्रगतीपथावर कामे: शहरातील नाले, रस्ते, पाईपलाईन, स्वच्छता आणि जोड रस्त्यांची अनेक कामे पूर्ण झाली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर असल्याचे नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांनी सांगितले.या निधीमुळे केज शहराच्या विकासाला एक नवी दिशा आणि गती मिळाली असून, शहरवासीयांचे विकासाचे स्वप्न साकारताना दिसत आहे.

## आडसकर फॅक्टर' ठरणार निर्णायक! केज, अंबाजोगाई, धारूरमध्ये राजकीय प्रभाव



प्रकाश मुंडे/बीड जिल्हा प्रतिनिधी आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत रमेश आडसकर यांचा 'फॅक्टर' केज, अंबाजोगाई आणि धारूर या तीन तालुक्यांच्या राजकारणात अत्यंत निर्णायक ठरु शकतो, अशी चर्चा आहे.

जनतेची सहानुभूती: मागील 10 वर्षांपासून सत्तेबाहेर असल्याने आडसकरांना जनतेची मोठी सहानुभूती मिळत आहे. याच सहानुभूतीला मतांमध्ये बदलण्यासाठी त्यांनी 'ग्राउंड लेवल'वर सक्रियता वाढवली आहे.

अंबाजोगाई साखर कारखाना: त्यांनी यशस्वीपणे साखर कारखाना पुन्हा सुरु केल्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी (ऊस उत्पादक) आणि कामगारांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. वेळेत आणि चांगला दर देण्याच्या ग्वाहीमुळे कृषी अर्थकारणावर थेट परिणाम होत आहे.

राजकीय पकड: कारखाना सुरु झाल्याने आणि जनतेच्या कामांची निकड असल्याच्या स्थानिक मतप्रवाहामुळे आडसकर यांची राजकीय पकड आणखी मजबूत झाली आहे.

निष्कर्ष: अंबाजोगाई साखर कारखान्याचे यश, 10 वर्षांची सहानुभूती आणि तीन तालुक्यांमधील राजकीय प्रभाव यामुळे जिल्हा परिषद निवडणुकीत आडसकर फॅक्टर महत्त्वाची भूमिका बजावणार हे निश्चित आहे. त्यांच्या राजकीय भांडवलाचे मतांमध्ये रूपांतर कसे होते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

हॅलो बीड
परळी संघर्षनेता
शुक्रवार दि. 07 नोव्हेंबर 2025


# जरांगेंच्या आरोपांवरून धनंजय मुंडेंची थेट सीबीआय चौकशीची मागणी, माझ्यासह सर्वांचीच नार्को सह ब्रेन मॅपिंग टेस्ट करा

## मनोज जरांगेचे आरोप म्हणजे निव्वळ थोतांडगिरी, ओबीसी नेतृत्व संपवण्याचा डाव धनंजय मुंडे





अनेक वर्ष जुने सहकारी आहेत. त्यातल्या एकावर मागील वर्षी एप्रिल महिन्यात हल्ला झाला तेव्हा जरांगेंनी त्याला पोलीस संरक्षण देण्याची मागणी केली होती, म्हणजे आपलेच जवळचे लोक पाठवायचे त्यांना कुणाच्या तरी मार्फत ओळख करून घ्यायला लावायचे, काहीतरी फेक रेकॉर्ड वगैरे बनवायचे आणि आरोप करून खळबळ उडवून एखाद्याची प्राणांतिक बदनामी करायची, हा कावा आता ओळखला आहे, त्यामुळे जरांगे यांनी केलेले आरोप म्हणजे निव्वळ थोतांडगिरी आहे असाही प्रत्यारोप धनंजय मुंडे यांनी केला आहे.

मी मागील 30 वर्षांपासून समाजकारण आणि राजकारणामध्ये सक्रिय आहे. माझ्या

## जरांगे आणि त्याच्या टोळी पासून माझ्याही जीवाला धोका - मुंडेंचा गौफ्यस्फोट

परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी) - मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी आपल्यावर माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांच्यामार्फत घातपात केला जात असल्याचा आरोप केल्यानंतर धनंजय मुंडे यांनी त्यास प्रत्युत्तर देत थेट आरोप करणारे जरांगे, आरोपी आणि माझी स्वतःची देखील थेट सीबीआय मार्फत चौकशी केली जावी, त्याचबरोबर अशा प्रकारच्या आरोपांची सत्यता पडताळून सत्य महाराष्ट्राच्या जनतेच्या समोर यावे यासाठी ब्रेन मॅपिंग व नार्को टेस्ट करावी, असे आवाहन धनंजय मुंडे यांनी आज पत्रकार परिषदेत केले आहे.

मनोज जरांगे यांनी जे आरोपी म्हणून पुढे केले आहेत, ते त्यांचेच समाजापेक्षा मराठा समाजात माझे मित्र व सहकारी जास्त आहेत, पहिल्यापासून मराठा समाजाच्या आरक्षणाच्या प्रत्येक लढ्यात मी बरोबरीने सहभाग घेतला. मात्र प्रथमच ओबीसी महा एल्गार मेळाव्यातून मी इडब्लूएस आरक्षण कसे अधिक फायद्याचे आहे यावरून बोललो तसेच

## आज ठळक

### जमीन घोटाळा प्रकरणात पार्थ पवार यांना मोठा दणका



उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांच्यावर जमीन घोटाळ्याचा आरोप करण्यात आला आहे, त्यामुळे आता पार्थ पवार चांगलेच आडचणीत सापडले आहेत. पुण्यातील 1800 कोटी रुपयांची जमीन 300 कोटी रुपयांना खरेदी केल्याचा आरोप आहे, तसेच 300 कोटी रुपयांच्या जमिनीसाठी नियमानुसार दोन टक्क्यांप्रमाणे सहा कोटी रुपयांची स्टॅम्प ड्युटी भरणं अपेक्षित असताना केवळ 500 रुपयेच भरण्यात आल्याचं देखील समोर आलं आहे. हे प्रकरण समोर आल्यानंतर आता विरोधकांकडून सरकारच्या कोंडीचा प्रयत्न सुरु आहे. आता या प्रकरणात मोठी बातमी समोर आली आहे.ती म्हणजे हा जमीन व्यवहार रद्द करण्यासाठी पार्थ पवार यांच्याकडून अर्ज करण्यात आला होता, मात्र हा अर्ज फेटळाण्यात आला आहे. अमेडीया कंपनीकडून कॅन्सलेशन डिड कागदपत्रे करण्यासाठी पुणे सब रजिस्टर यांच्याकडे हा अर्ज करण्यात आला होता. मात्र सब रजिस्टर कडून संबंधीत अर्ज फेटाळण्यात आला आहे. स्टॅम्प ड्युटी पूर्ण भरल्याशिवाय अर्ज स्वीकारता येणार नाही म्हणत, दुय्यम निबंधक यांनी हा अर्ज फेटाळून लावला आहे, त्यामुळे आता

### पार्थ पवारांना जमीन खरेदी प्रकरणात अभय दिला? देवेंद्र फडणवीसांनी दाखल झालेल्या FIR बाबत दिलं स्पष्टीकरण




उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने पुण्याच्या कोरेगाव पार्क येथील 40 एकरांचा भूखंड विकत घेतल्यानंतर राजकीय आरोप होत आहेत. या प्रकरणाच्या चौकशीसाठी अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे.

दरम्यान अमेडिया होल्डिंग्ज एलएलपी या कंपनीने महार वतन असलेल्या 40 एकर जमिनीची खरेदी केल्याचे बोलले गेले. या खरेदी व्यवहाराचे कोट्यवधीचे मुद्रांक शुल्कही भरलेले नाही, असा आरोप करण्यात आला. कंपनीत पार्थ पवार यांची 99 टक्के भागीदारी असताना त्यांना गुन्ह्यातून वगळण्यात आल्याचा आरोप विरोधक करत आहेत. दरम्यान या प्रकरणावर आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.देवेंद्र फडणवीस म्हणाले , "माझ्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार, हा जो करार त्यांनी केला होता. त्यामध्ये पैशाचे देवाणघेवाण बाकी होती, पण रजिस्ट्री पूर्ण झाली होती. दोन्ही पक्षांनी ही रजिस्ट्री रद्द करावी असा अर्ज केला आहे. त्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना जे पैसे भरावे लागतात, कारण रजिस्ट्री रद्द करायची असेल तरी पैसे भरावे लागतात. त्या संदर्भातील नोटीस त्यांना पाठवण्यात

## मयंक गांधींनी केलेले प्रयोग देशभरात नेणार; ग्लोबल विकास ट्रस्टसोबत मिळून केंद्र सरकार काम करणार - कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान

» केंद्र सरकारने संपूर्ण कर्जमाफी करून शेतकऱ्यांना धीर द्यावा; मयंक गांधींची केंद्रीय कृषिमंत्र्यांना विनंती








**अभूतपूर्व शेतकरी संवाद मेळावा ठरला परिवर्तनाची नांदी;**

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) देशात साडेसहा लाख गावे आहेत... संकल्प केला तर सर्व गावांत परिवर्तन घडू शकते. मला इथे येऊन स्वागत किंवा जयजयकार करून घ्यायचा नव्हता. मला इथे ग्लोबल विकास ट्रस्टने केलेले आदर्शवादी काम पहायचे होते. शेतकऱ्यांच्या जीवनात खरोखरच आर्थिक क्रांती घडू शकते हा आत्मविश्वास इथे आल्यानंतर मला आणि सर्वकाही पाहिल्यानंतर वाटतो आहे. जलसंवर्धन, नदी पुनरुज्जीवन, फळबाग लागवड, तुतीची शेती यावर त्यांच्यासोबत बसून एक अभ्यासपूर्ण मॉडेल बनवून त्याला देशभर लागू करायचे असल्याचे प्रतिपादन केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केले. ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने आयोजित भव्य शेतकरी संवाद मेळाव्यात बोलतांना केले. यावेळी कार्यक्रमास जलनायक मयंक गांधी, युपीएलचे विक्रम श्रॉफ, रवी झुनझुनवाला, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाचे डॉ.इंद्रमणी त्रिपाठी, ग्लोबल विकास ट्रस्टचे संचालक डॉ.हरिश्चंद्र वंगे आदि मान्यवरांची उपस्थिती होती.

शेतकऱ्यांचे उत्पन्न एवढे वाढेल की

## माझ्या नवऱ्याला महिन्यापासून दारु पाजून जरांगेविरुद्ध षडयंत्र रचलं;

### अमोल खुणेंच्या कुटुंबीयांनी सगळंच सांगितलं



मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आज माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले. माझ्या हत्येचा कट धनंजय मुंडे यांच्या सांगण्यावरुन रचण्यात आल्याचा आरोप जरांगे पाटील यांनी केला. या आरोपानंतर राज्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी कारवाई केली असून गेवराई तालुक्यातील धानोरा येथील अमोल खुणे यांना ताब्यात घेतले. दरम्यान, खुणे यांच्या कुटुंबीयांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिल्या, यावेळी त्यांनी गंभीर आरोप

## हत्येच्या कटावरुन मनोज जरांगेंचा थेट धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप



अंतरवाली सराटी (जालना): मराठा आरक्षणासाठी राज्यात मोठे आंदोलन उभे करणारे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या हत्येचा 2.5 कोटी रुपयांचा कट उघडकीस आल्यानंतर, आता या प्रकरणाला मोठा राजकीय वळण मिळाले आहे. जरांगे पाटील यांनी थेट माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर हा कट रचल्याचा गंभीर आरोप केला आहे. जरांगे पाटील यांनी संपूर्ण घटनाक्रम सांगताना, मराठा समाजाने शांत राहण्याचे आणि राज्यातील सर्व नेत्यांनी या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेण्याचे आवाहन केले आहे.

अंतरवाली सराटी येथे पत्रकारांशी बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी हत्येच्या कटाचा सूत्रधार 'एका मोठ्या व्यक्ती'चा उल्लेख करत थेट धनंजय मुंडे यांचे नाव घेतले. जरांगे पाटील यांनी

## परळीच्या बोगस भुयारी गटार योजनेचा तो लाडका गुत्तेदार कुठे दिसला का?बहादुरभाई



परळी प्रतिनिधी परळी शहरात बोगस कामे करुन करोडो रुपये कमवणारा तो लड्डा नामक गुत्तेदार कुठे दिसला का असा सवाल सोशल मिडिया व नगर परिषद प्रशासनाला काँग्रेस शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी केला आहे.

परळी शहराच्या नगरपालिकेच्या विकास कामाचा लाडका जावई प्रमाणे असणारा गुत्तेदार लड्डा याने जवळजवळ 150 कोटी रुपयांचे काम घेतली परळी शहरात भुयारी गटार योजनना 50 कोटी, रस्ते 54 कोटी,लोकनेते गोपीनाथ मुंडे नटराज रंग मंदिर 2 कोटी ची दुरुस्ती चे करोडोचे काम घेतले आणि भुयारी गटार योजना अधुरी, रस्ते निकृष्ट, लोकनेते गोपीनाथ मुंडे नटराज रंग आजही अधुरे शहरातील चांगले सर्व रस्ते उकडून रस्त्याच्या मधोमध भुयारी गटार योजनेच्या नावाखाली बोगस अधुरे काम करून परळीकरांना गेली तीन-चार वर्ष वेटीस

धरले आहे. मानसिक त्रास दिला

## विद्यार्थ्यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखे ज्ञान संपादन करावे - रानबा गायकवाड

### नवीन प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी साजरा केला 'विद्यार्थी दिन'




परळी वैजनाथ, (बातमीदार):- जगातील सर्वोत्तम विद्यार्थी म्हणून महामानव, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतले जाते. त्यामुळे आजच्या विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखे ज्ञान संपादन करावे असे आवाहन जेष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड यांनी केले.

येथील थर्मल वसाहतीतील नवीन प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी शुक्रवारी (दि.7) विद्यार्थी दिनानिमित्त रेल्वे स्थानक परिसरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करुन

## 'शब्द की पुत्रप्रेम'? खा. बजरंग सोनवणे यांना केजच्या जनतेचा सवाल!



प्रकाश मुंडे/बीड जिल्हा प्रतिनिधी बीड (Beed) लोकसभा निवडणुकीत (Lok Sabha Election) विजय मिळवून खासदार (MP) झालेले बजरंग सोनवणे (Bajrang Sonawane) यांनी मतदारांना व विशेषतः काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष (Congress District President) राहुल सोनवणे (Rahul Sonawane) यांना दिलेला शब्द पाळणार का? युसुफ वडगाव जिल्हा परिषद (Yusuf Wadgaon Zilla Parishad) गटातील राजकीय घडामोडींमुळे हा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

खासदार सोनवणे यांनी लोकसभा निवडणुकीच्या

## बागवान समाजाचा नंदकिशोरजी मुंदडा यांना 'काकाजीं'ना नगराध्यक्ष करण्याचा निर्धार!



प्रकाश मुंडे/ बीड जिल्हा प्रतिनिधी अंबाजोगाई नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदरणीय नंदकिशोरजी (काकाजी) मुंदडा यांनी गुरुवारी दि.06/11/2025 रोजी शहरातील बागवान समाज बांधवांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीवेळी बागवान समाजाच्या वतीने काकाजींचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

बागवान समाजाच्या बांधवांनी यावेळी काकाजींच्या कार्याचा गौरव केला. समाज बांधवांनी सांगितले की, "काकाजींनी मागील 47 वर्षांच्या राजकारणात